राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचा-यांच्या
वाहतूक भत्त्याच्या (Transport Allowance)
दरात सुधारणा करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
शासन निर्णय - क्रमांक:- वाहभ-२००९/प्र.क्र.७८/सेवा-५
दिनांक:- ५ एप्रिल, २०१०

**पहा :-**
१) शासन निर्णय वित्त विभाग, क्र.वाहभ-१०९८/प्र.क्र.८३/सेवा-५ दि.१४ डिसेंबर,१९९८.
२) शासन निर्णय वित्त विभाग, क्र.वाहभ-१०९९/प्र.क्र.८२/९९/सेवा-५ दि. ७ सप्टेंबर,१९९९.
३) शासन निर्णय वित्त विभाग, क्र.वाहभ-१३००/प्र.क्र.५७/सेवा-५ दि.४ जून,२००१.
४) शासन परिपत्रक वित्त विभाग, क्र.वाहभ-१०९९/प्र.क्र.४५/सेवा-५ दि.९ मे,२००३.
५) शासन निर्णय वित्त विभाग, क्र.वाहभ-१००३/प्र.क्र.६४/सेवा-५ दि.२ ऑगस्ट,२००४.
६) शासन निर्णय वित्त विभाग, क्र.घभाभ-१००५/प्र.क्र.१३/सेवा-५ दि.१७ जून,२००५.
७) केंद्र शासन, वित्त मंत्रालय, व्यय विभाग यांचे कार्यालयीन ज्ञापन क्र.२१(२)/२००८ -इ-दोन(बी) दि.२९ ऑगस्ट, २००८.
८) शासन निर्णय वित्त विभाग, क्र.घभाभ-१००९/प्र.क्र.६७/सेवा-५ दि.२४ ऑगस्ट, २००९.

**प्रस्तावना :-** केंद्र शासनाने सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने वरील क्र.७ येथील दि.२९ ऑगस्ट, २००८ रोजीच्या आदेशान्वये निवासस्थानापासून कर्तव्य स्थानापर्यंतच्या प्रवासावरील खर्चाची भरपाई म्हणून सुधारित दराने वाहतूक भत्ता (Transport Allowance) मंजूर केला आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ अन्वये राज्य शासकीय कर्मचा-यांना दि.१ जानेवारी, २००६ पासून सुधारित वेतन संरचना लागू करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने, राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचा-यांना मंजूर केलेल्या वाहतूक भत्त्याच्या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय**

**शासन असे आदेश देत आहे की, राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचा-यांना अनुज्ञेय असलेल्या वाहतूक भत्त्याचे दर खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे सुधारण्यात यावेत.**

**हे आदेश दिनांक १ एप्रिल, २०१० पासून अंमलात येतील.**

| अ.क्र. | कर्मचा-यास अनुज्ञेय असलेले ग्रेड वेतन (रू.) | दरमहा वाहतूक भत्त्याचा दर (रू.) | |
|---|---|---|---|
| | | अ-१ आणि अ वर्ग शहरे | इतर ठिकाणे |
| १ | रू.५४००/- किंवा त्याहून अधिक | १६००/- | ८००/- |
| २ | रू.४४००/- किंवा त्याहून अधिक परंतु रू.५४००/- पेक्षा कमी | ८००/- | ४००/- |
| ३ | रू.४४००/- पेक्षा कमी | ४००/- | २००/- |

२. या आदेशामध्ये नमूद केलेली अ-१ आणि अ वर्ग शहरे ही स्थानिक पूरक भत्त्याच्या प्रयोजनार्थ केलेल्या शहरांच्या वर्गीकरणाप्रमाणे राहतील. मात्र वर क्र.८ येथील दि.२४ऑगस्ट, २००९ रोजीच्या आदेशातील परिच्छेद ४ अन्वये केलेले स्थानिक पूरकभत्त्याच्या प्रयोजनार्थ विद्यमान वर्गीकरण वाहतुक भत्त्याच्या मंजुरीच्या प्रयोजनार्थ लागू असणार नाही.

३. ह्या आदेशातील वाहतूक भत्त्याचे प्रदान खाली नमूद केलेल्या अटींच्या अधिन आणि त्यानुसार विनियमित करण्यात येईल.

एक) कर्तव्य स्थानापासून एक किलोमिटर अंतराच्या आत किंवा कर्तव्यस्थान आणि निवासस्थान ह्यांच्या एकत्र परिसरात (Campus) शासकीय निवासस्थान पुरविण्यात आलेल्या कर्मचा-यांना हा भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

दोन) ज्या कर्मचा-यांना शासकीय वाहतूक सुविधा (Government Transport) पुरविण्यात आली आहे, त्यांना हा भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

तीन) शासन निर्णय वित्त विभाग, क्र.वाहभ-१००३/प्र.क्र.६४/सेवा-५ दि.२ ऑगस्ट, २००४ अन्वये अंध, अस्थिव्यंगाने अधू आणि कण्याच्या विकाराने पीडित असणा-या राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचा-यांना वाहतुक भत्ता मंजूर करण्यात आला आहे. अशा कर्मचा-यांना पुढीलप्रमाणे सुधारित दराने वाहतुक भत्ता **दि.१ एप्रिल, २०१० पासून** मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचा-यास अनुज्ञेय असलेले ग्रेड वेतन (रू.) | दरमहा वाहतूक भत्त्याचा दर (रू.) | |
|---|---|---|---|
| | | अ-१ आणि अ वर्ग शहरे | इतर ठिकाणे |
| १ | रू.५४००/- किंवा त्याहून अधिक | ३२००/- | १६००/- |
| २ | रू.४४००/- किंवा त्याहून अधिक परंतु रू.५४००/- पेक्षा कमी | १६००/- | १०००/- |
| ३ | रू.४४००/- पेक्षा कमी | १०००/- | १०००/- |

तसेच वाहतूक भत्त्याचे प्रदान करण्यासंदर्भात इतर विद्यमान तरतुदी व कार्यपद्धती आहे त्याचप्रकारे यापुढे लागू राहील.

४. रजा, प्रशिक्षण, दौरा इत्यादी कारणांमुळे ३० दिवसांपेक्षा जास्त अनुपस्थितीच्या कालावधीसाठी हा भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

५. शासन असेही आदेश देत आहे की, सर्व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्थांच्या प्राथमिक, माध्यमिक शाळांतील पूर्णकालीक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच कृषि व कृषितर विद्यापीठांमधील व तत्संलग्न महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना सदरहू आदेश लागू असतील.

६. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा अधिनियम क्रमांक ५) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार व त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करून शासन असेही आदेश देत आहे की, जिल्हा परिषदांच्या पूर्णकालिक कर्मचा-यांना हे आदेश योग्य त्या फेरफारासह लागू करण्यात यावेत.

७. शासन असेही आदेश देत आहे की, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनमानानुसार वेतन घेणा-या शिक्षक कर्मचा-यांनाही हे आदेश लागू करण्यात यावेत.

८. शासकीय कर्मचा-यांच्या वाहतूक भत्त्यावरील खर्च त्यांचे वेतन व भत्ते ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकून त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. अनुदानप्राप्त संस्था, नगरपालिका व जिल्हा परिषदा यांच्या

कर्मचा-यांचा बाबतीत, संबंधित प्रमुख लेखाशीर्षाखालील ज्या उप लेखाशीर्षाखाली त्यांच्या सहाय्यक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची टाकण्यात येतो, त्या उप लेखाशीर्षाखाली हा खर्च खर्ची टाकण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक संकेतांक २०१००४०५१३४६२०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( शि. म. म्हात्रे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
मंत्रालयीन सर्व विभाग
मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख.
# प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
# प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
# सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
# सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
# प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
#आयुक्त, राज्य माहिती आयोग, (सर्व)
# सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
#प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद.
राज्य महिला आयोग, मुंबई
सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,मंबई.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषदा
महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड. पुणे
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
सिनियर रिसर्च ऑफीसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर.
कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद.
मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/देहू रोड/देवळाली/अहमदनगर
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा अहमदनगर
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला
कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती
कुलसचिव, श्रीमती नाथाबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई / पुणे/ नागपूर/ औरंगाबाद /नाशिक/ अमरावती.
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-९)